उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१. यांचे कार्यालय
30 JAN 2004
363
आवक नोंदवही क्रमांक

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: व्हीएलएस १००४/(१(५)/२००४)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २००४.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे / नासिक / औरंगाबाद /नांदेड /अमरावती .

**विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त इतर माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील २२ (बावीस ) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००३ पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.व्हीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

मुख्याध्यापक
अनंतराव पवार प्राथमिक विद्यालय
नगर-निमगाव,ता इंदापूर,जि.पुणे
युडायस क्रमांक-२७२५०६०७२०:

C:\ARUN\ENGLISH PER\English 918-03 02.12-03 FORWARDING

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. **तसेच सोबतच्या यादीतील संस्थेस त्याच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी जर यापूर्वी नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यांस परवानगी दिली असेल तर प्रथम मान्यता देण्यापूर्वी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावी.** याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

( सु.ह. उमराणीकर )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/जळगांव/जालना/उस्मानाबाद/नांदेड/नंदूरबार/यवतमाळ/अकोला.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

मुख्याध्यापक
अनंतराव पवार प्राथमिक विद्यालय
नेर-निमगाव, ता इंदापूर, जि.पुणे

शासन पत्र क्रमांक व्हीएलएस-१००४/(१(५)/०४)/प्राशि-३,दिनांक : २१ जानेवारी, २००४ चे

सहपत्र

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित मराठी ,उर्दू व तेलगू माध्यमाच्या

परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची नांवे.

**जिल्हा - पुणे.**

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | कै. अनंतराव पवार ग्रामविकास प्रतिष्ठान, निरनिमगाव, ता.इंदापूर,जि.पुणे | निरनिमगांव, ता. इंदापूर,जि.पुणे | मराठी | १ ली |
| २ | पुणा शिक्षण संस्था, कावेरीनगर, फाटा, थेरगांव, पुणे-३३ | थेरगांव, पुणे-३३. | हिंदी | १ ली |
| | | **जिल्हा - सोलापूर** | | |
| ३ | श्री. गणेश शिक्षण व क्रिडा बहुददेशीय संस्था, सोलापूर. | भारतनगर, विडी घरकुल, सोलापूर | तेलगू | १ ली |
| ४ | अल् कुरआन एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट, १४७८, गरीबी हटाव नं.२, सोलापूर. | प्रभाग क्र. १९, गरीबी हटाव नं.२, सोलापूर | उर्दु | १ ली |
| ५ | मा. शरदचंद्रजी पवार शिक्षण प्रसारक मंडळ, पळशी, पंढरपूर. | गाताडे प्लॉट, जुना कराड नाका, पंढरपूर | मराठी | १ ली |
| ६ | लक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळ, दामाजीनगर, मंगळवेढा, जि.सोलापूर | शिक्षक कॉलनी, मंगळवेढा, जि.सोलापूर. | मराठी | १ ली |
| | | **जिल्हा - जळगांव** | | |
| ७ | अमर संस्था, चोपडा, जुने दत्त मंदिर, चोपडा, जि.जळगांव | जुने दत्त मंदिर, चोपडा,जि.जळगांव | मराठी | १ ली |
| | | **जिल्हा - जालना** | | |
| ८ | श्री. महेश शिक्षण संस्था, टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद,जि. जालना | टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद, जि.जालना | मराठी | १ ली |
| ९ | स्व. गिरीश येमुल बहुउददेशीय शिक्षण प्रसारक मंडळ,चंदनझिरा, जालना | सत्मनगर, चंदनझिरा, जालना | मराठी | १ ली |
| १० | वैद्यराज सिताराम घुले ग्रामीण विकास व शिक्षण संस्था, चिकलठाणा, औरंगाबाद. | नविन वसाहत, अंबड,जि.जालना | मराठी | १ ली |
| | | **जिल्हा - उस्मानाबाद.** | | |
| ११ | श्री. रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, बेंगलोर | उस्मानाबाद. | मराठी | १ ली |
| १२ | श्री. श्री. रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट,बेंगलोर | उमरगा, उस्मानाबाद. | मराठी | १ ली |

मुख्याध्यापक
अनंतराव पवार प्राथमिक विद्यालय

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | हस्मी एज्युकेशन सोसायटी, शिराढोणे, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | रांजणी, ता. कळंब | उर्दू | १ ली |
| | | जिल्हा - नांदेड | | |
| १४ | तरोडा सेवाभावी संस्था, सहयाद्री नगर, तरोडा बु.नांदेड | गणपूर-कामठा, ता.अर्धापूर,जि.नांदेड | मराठी | १ ली |
| १५ | जय जवान जय किसान शिक्षण संस्था, कंधार,जि. नांदेड | बाचोटी, ता. कंधार | मराठी | १ ली |
| | | जिल्हा - नंदूरबार. | | |
| १६ | शैक्षणिक सांस्कृतिक क्रिडा व क्रिडाविकास मंडळ, वाघाळे | कोकणी हिल, दुधाळे, नंदूरबार | मराठी | १ ली |
| १७ | छाया जैन स्मृति समिती, नंदूरबार | जिल्हाधिकारी आवार कार्यालय, नंदूरबार | मराठी | १ ली |
| | | जिल्हा - यवतमाळ. | | |
| १८ | विद्यार्थी विकास सेवा समिती, पुसद,जि.यवतमाळ. | महागांव, जि.यवतमाळ | मराठी | १ ली |
| | | जिल्हा - अकोला | | |
| १९ | श्रीमती शांताबाई चिंचोळकर शिक्षण संस्था, वाडेगांव, ता. बाळापूर,जि.अकोला | वाडेगांव, ता. बाळापूर | मराठी | १ ली |
| २० | बालाजी युवक क्रिडा मंडळ, वाडेगांव, ता. बाळापूर,जि.अकोला | वाडेगांव, ता. बाळापूर | मराठी | १ ली |
| २१ | राष्ट्रसंत शिक्षण संस्था, जवाहरनगर, अकोला | आवळे प्लॉट, गजानन नगर, अकोला | मराठी | १ ली |
| २२ | आदर्श मॉन्टेसरी शिक्षण प्रसारक संस्था, जलतारे प्लॉट, हिवरखेड रोड,अकोट | शिवाजीनगर, पो.अडगांव बु. क्षा. तेल्हारा | मराठी | १ ली |

**एकुण :- २२ (बावीस) प्राथमिक शाळा**

मुख्याध्यापक
अनंतराव पवार प्राथमिक विद्यालय
[illegible] निमगाव, ता इंदापूर, जि.पुणे
[illegible] २७२५०६०७२०